नियमित फौ. ख. क्र. ५१/२०२३
सरकार -वि.- बबन व इतर
नि.क्र. ३०.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अनिकेत राजू वैद्य,
वय २४ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – पुल्लर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपींना ओळखतो. ते आज कोर्टात हजर आहेत. घटना ही १७.०६.२०२३ रोजी पुल्लर गावाच्या चौकामध्ये संध्याकाळी ५.३० वाजता दरम्यान घडली होती. त्यादिवशी माझे मोठे वडील तुकडोजी वैद्य ते पानठेल्यावर बसले होते. त्यावेळी बबन चौधरी, शुभम महाजन व रोहीत चौधरी यांनी तुकडोजी वैद्य यांना वेळवाच्या काठीने मारहान केली. त्यामुळे त्यांना डाव्या कानाला, उजव्या हाताला व पाठीला मार लागला होता. त्यावेळी मी घरी होतो ते जखमी अवस्थेत घरी आले. त्यावेळी लोकांनी मला सांगितले की, त्यांना मारहान झाली होती. मी त्यांना दवाखान्यात घेऊन गेलो. त्यानंतर त्यांना पोलीस स्टेशनला नेले तेथे फिर्याद दिली. ज्या काठीने त्यांना मारहाण झाली ते मी ओळखू शकतो. आता मला दाखविलेले आर्टिकल 'अ व ब' वरील काठ्या त्याच आहेत.

सरतपास संपला.

**आरोपी तर्फे उलट तपास त्यांचे वकील श्री नागोसे यांचे मार्फत** -

२. हे म्हणणे खरे आहे की, तुकडोजी वैद्य माझे सख्खे मोठे वडील आहेत. चेतना ही तुकडोजी यांची मुलगी आहे. तिचे शिक्षण बी.एस.सी. पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रोहीत चौधरी दहावी पास आहे. हे मला माहीत नाही की, रोहीत चौधरी याची घरची परिस्थिती जेमतेम आहे. हे मला माहीत नाही की, चेतना व रोहीत यांचे प्रेम संबंध होते त्यामुळे त्यांचे लग्न झाले. मी गावात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, चेतना ही रोहीतच्या घरी लग्नानंतर राहिली होती. हे मला माहीत नाही की, चेतनाने रोहीत सोबत लग्न केले हे तुकडोजी वैद्य व त्यांच्या पत्नीला आवडले नव्हते. हे मला माहीत नाही की, चेतनाची

आई तिला पुन्हा माहेरी येण्यासाठी वारंवार सांगत होती. हे मला माहीत नाही की, चेतना ही समजायला तयार नव्हती त्यामुळे ती माहेरी राहायला आली नाही. हे मला माहीत नाही की, त्यामुळे माझे मोठे आई वडील अस्वस्थ झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटना माझे समक्ष घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, काही दिवसांनी माझ्या मोठ्या आई वडीलांनी चेतानाला माहेरी आणले होते. साक्षीदार सांगतो चेतना स्वतः आली होती. हे म्हणणे खरे नाही की, चेतना स्वतः माहेरी आली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मोठ्या वडीलांनी रोहीत चौधरीसोबत चेतनाची सोडचिठ्ठी न घेता तिचे दुसरे लग्न लावून दिले. हे मला माहीत नाही की, रोहीत चौधरी याने दुसरे लग्न झाले तरीही त्रास दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल 'अ व ब' या काठ्या वेळावाच्या नाही. वेळवाची काठी तिसरी होती. हे म्हणणे खरे नाही की, वेळवाची तिसरी काठी होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आरोपीसोबत बोलणे चालणे बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, चेतनाने रोहीत सोबत लग्न केले असल्यामुळे मला त्याच्यावर राग आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या मोठ्या वडीलांना वेळवाच्या काठीने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कुठलेही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी काल्पनीक कथा रंगवून खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,<br>
माझे समक्ष,<br>
स्वा/-<br>
(एस. जे. लाड)<br>
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,<br>
भिवापूर.

दिनांक – ११.०९.२०२५